**निशाणी १३**

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र. १ याची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,**

माझे नाव – रंजना दादाभाऊ मुठे, वय – ४० वर्षे,
व्यवसाय – मजुरी, राहणार – खडकी,
तालुका – अकोले, जिल्हा – अहमदनगर.

**सरतपास अभियोगपक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती एस. ए. भोसले यांच्या मार्फत –**

१. माझे लग्न आरोपी दादाभाऊ सोबत दिनांक ३०.०४.१९९९ रोजी झाले होते. लग्नानंतर मी सासरी नांदायला गेले. त्यादरम्यान मला दोन मुलं झाली. लग्नानंतर चार ते पाच वर्ष माझा संसार चांगला चालला. त्यानंतर घराचे कर्ज झाल्यामुळे माहेरवरून वीस हजार रूपये सासरच्या लोकांनी आणण्यास सांगितले. पैसे नाही आणले तर तुला नांदवणार नाही असे म्हणाले. त्यानंतर सासरच्या लोकांनी मला त्रास देण्यास सुरूवात केली. माझ्या पतीस दारूचे व्यसनही लागले. व्यसन लागल्यानंतर माझा पती मला खुप त्रास देत होता व मारहाण करत होता. त्यांना सखाराम दगडु कचरे यांची मुलगी योगिता हिचा नाद लागला. मी माझ्या पतीस ती बाई कोण आहे असे विचारले असता माझ्या पतीने मला तिचे नाव घ्यायचे नाही, नाहीतर जिवंत ठेवणार नाही असे म्हणाला. त्यानंतर माझा पती योगितासोबत पळून गेला. त्यानंतर माझ्या सासरचे लोक हे उपाशी ठेवायचे, त्रास द्यायचे. ते मला म्हणायचे की, तुझा नवरा येथे नाही, तु येथे राहायचे नाही, तसेच ते मला त्रास द्यायचे, मारहाण करायचे, शिवीगाळ करायचे. त्यानंतर तु येथे राहायचे नाही म्हणून मला दिनांक २२.०१.२०१० रोजी घराबाहेर काढून दिले. त्यानंतर मी माहेरी आले व आरोपींविरूध्द पोलीस स्टेशनला फिर्याद दिली.

२. आता मला मी दिलेली फिर्याद दाखविण्यात आली त्यावर

माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **निशाणी १४** देण्यात येते. मी आरोपीस ओळखते. तो आजरोजी न्यायालयात हजर आहे.

<u>उलटतपास आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. बी. व्ही. मोरे यांच्या मार्फत</u> –

३. माझ्या सासरच्या लोकांकडे घर बांधल्याचे कर्ज झाले होते. किती कर्ज झाले होते हे मला सांगता येणार नाही. कर्ज हे कोणाचे झाले होते हे मला सांगता येणार नाही. सासरच्या लोकांनी मला माहेरवरून वीस हजार रूपये कोणत्या तारखेला आणण्यास सांगितले होते हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सासरच्या लोकांनी मला कधी त्रास देण्यास सुरूवात केली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती हे योगिता सोबत पळून गेले ही माझी ऐकीव माहीती आहे. हे म्हणणे खरे आहे की, सखाराम दगडू कचरे यांची मुलगी योगिता हिचे अगोदरच लग्न झालेले होते. योगिताचे नाव घ्यायचे नाही नाहीतर तुला जिवंत ठेवणार नाही अशी धमकी माझ्या पतीने मला कधी व कोणत्या तारखेला दिली हे सांगता येणार नाही.

४. मला एक मुलगा एक मुलगी आहे व माझ्या मुलीचे लग्न झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीस दारू पिण्याची सवय लागली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीचे व माझ्या भायाचे आपसात पटत नव्हते म्हणून माझ्या सासुने आम्हाला विभक्त केले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्याकडे कधीही वीस हजार रूपयांची मागणी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती यांना सखाराम दगडू कचरे यांच्या मुलीचा नाद लागला व ते तिच्यासोबत पळून गेले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सासरच्या लोकांनी मला कधीही त्रास दिला नाही, माराहाण केली नाही, उपाशी ठेवले नाही, धमकी दिली नाही. हे

म्हणणे खरे नाही की, सासरच्या लोकांनी मला मारहाण करून कधीही घराच्या बाहेर काढून दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला आरोपी दादाभाऊ सोबत नांदायचे नव्हते म्हणून त्याचेविरूध्द खोटी केस दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, खोटी केस दाखल केली असल्यामुळे आरोपीविरूध्द खोटा जबाब देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE Date: 2026.04.07 17:06:33 +0530

दिनांक ०७.०४.२०२६
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले.